# बिट्स पिलानी गोवा कॅम्पसमध्ये ९ रोजी शास्त्रीय संगीत मैफल

**प्रतिनिधी वास्को :** बिट्स पिलानी के. के. बिर्ला गोवा कॅम्पसच्या 'श्रृतीलिया' क्लासिकल आर्टफॉर्म्स क्लबतर्फे रविवार दि. ९ रोजी सायं. ५ वा. प्रा. सुरेश रामास्वामी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ वार्षिक 'सूरसंगम' शास्त्रीय संगीत मैफलीचे आयोजन केले आहे. दिवंगत प्रा. सुरेश रामास्वामी यांनी श्रृतीलिया क्लबची स्थापना केली होती. यात चैन्नई येथील गायक रामकृष्ण मूर्ती यांना व्हायोलिनवर विठ्ठल रंगन बिल्वम तर मृदंगवर एनसी भारद्वाज साथसंगत करतील. बिट्सचे माजी विद्यार्थी सुकृत ताम्हणकर हिंदुस्थानी गायन सादर करतील. मैफल सर्वांसाठी खुली आहे. सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी नावनोंदणी करावी. अधिक माहितीसाठी (९४२५७५५७३३/ ८६६८४०२९८९) या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.